पार्वती आणि कालिका

अक्षय कथा



दुर्गा भागवत

पार्वती आणि कालिका

लेखिका

दुर्गा भागवत

ओरिएंट लाँगमन

ओरिएंट लॉंगमन लिमिटेड
रजिस्टर्ड कार्यालय
३-६-२७२ हिमायतनगर, हैद्राबाद ५०० ०२९
इतर कार्यालये
कामाणी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८
१७ चित्तरंजन ॲव्हेन्यू, कलकत्ता ७०० ०७२
१६० अण्णा सलाई, मद्रास ६०० ००२
१/२४ असफअली मार्ग, नवी दिल्ली ११० ००२
८०/१ महात्मा गांधी मार्ग, बंगळूर ५६० ००१
३-६-२७२ हिमायतनगर, हैद्राबाद ५०० ०२९
सिटी सेंटर अशोक, गोविंद मित्रा मार्ग, पाटणा ८०० ००४
हाउस नं. २८/३१, १५ अशोक मार्ग, लखनौ २२६ ००१
एस.सी. गोस्वामी रोड, पान बझार, गुवाहाटी ७८१ ००१
प्लॉट नं. २०५-ए, शहीद नगर, भुबनेश्वर ७५१ ००७

ISBN 0 86125 967 X

फोटो टाईपसेटींगः
शार्फोटाइप, कनाडा बिल्डिंग ४४,
तिसरा मजला, डी.एन. रोड,
मुंबई ४०० ००१.

मुद्रकः
बिंदू आर्ट, लोअर परळ, मुंबई ४०० ०११

प्रकाशकः
ओरिएंट लॉंगमन लि.,कामाणी मार्ग,
बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८

कालिका

कालिका हा पार्वतीचाच कराल अवतार आहे. कालिकेची–कालीची किंवा महाकालीची कथा अशीः विष्णुनं नरसिंहाचे रूप घेऊन हिरण्यकशिपू दैत्याला मारलं नि त्याचा मुलगा प्रल्हाद याला वरदान देऊन राज्य दिलं खरं; पण राक्षसकुळात मात्र त्यामुळे विष्णुबद्दल नि पर्यायाने सर्व देवांबद्दल वैर निर्माण झालं. हिरण्यकशिपूचा भाऊ हिरण्याक्ष यालाही वराह अवतारात विष्णूनेच ठार मारलं होतं. हिरण्याक्षाचे दोघे मुलगे, शुंभ व निशुंभ त्यामुळेच विष्णूचे वैरी बनले होते. त्यांनी उग्र तप करून ब्रह्मदेवाकडून वर मिळवला, की संपूर्ण विश्वावर आमची सत्ता असावी आणि आम्हाला कोणत्याही पुरुषाच्या हातून मरण येऊ नये; पण या वरामुळे ते फार क्रूर आणि उन्मत्त बनले.

सारं विश्व शुंभ आणि निशुंभामुळे गांजलं गेलं. देव चिंतेत पडले. इंद्र वगैरे सर्व देवांना त्या राक्षसांनी जिंकलं नि आपले दास करून सोडलं. त्यात ब्रह्मा, विष्णु, महेश हे देखील राक्षसांच्या तावडीतून सुटले नाहीत. त्यांचा ते सतत पाणउतारा करू लागले तेव्हा ते देव हिमालयाकडे गेले

आणि म्हणाले, ''हिमालया, शुंभ आणि निशुंभ या दैत्यांनी आम्हाला जिंकून आमची राज्यं बळकावली आहेत. अमरावती स्वर्गपुरी ताब्यात घेऊन आमचा वाटा ते आम्हाला मिळू देत नाहीत. सारं जग त्यांच्यापायी त्रासून गेलं आहे. तर तू आम्हाला या संकटातून सुटायचा काही उपाय सांग.''

हिमालयानं देवांना वचन दिलं आणि गंगेत स्नान करून त्यानं शंकराची नि अंबिकेची प्रार्थना आरंभली. ती ऐकून पार्वती संतुष्ट झाली.

''काय झालं? माझी का आठवण केली?'' तिनं विचारलं.

त्यावर शुंभ-निशुंभाची कथा हिमालयानं तिला सांगितली. ब्रह्मदेवाचा वरही सांगितला. पार्वती अगोदरच पतीचा अपमान झाला म्हणून क्रुद्ध झाली होती. आता तिच्या संतापाला पारावार राहिला नाही. संतापानं तिचं तोंड काळंनिळं झालं. तिच्या त्या चेहऱ्यातून एक अत्यंत सुंदर व तेजस्वी स्त्री निर्माण झाली. ही स्त्री सुंदर असली तरी संतापामुळे तिचा चेहरा भयानक दिसत होता. या स्त्री-रूपी देवतेचा रंग काळा होता म्हणून तिचं नाव कालिका असं पडलं. कालिका उत्पन्न झाल्यावर पार्वती म्हणाली, ''बाबा, तुम्ही परत जा. ही कालिका शुंभ-निशुंभांचा नाश करील नि सर्व संकटं दूर करील.''

पार्वतीला नमस्कार करून हिमालय परत गेला नि देवांना त्यानं हे वर्तमान सांगितलं. देव कालिकेच्या पराक्रमाची वाट पाहू लागले.

इकडे काय झालं? शुंभ-निशुंभ अमरावतीत इंद्राच्या सिंहासनावर बसून त्रैलोक्याचा मनमाना राज्य-कारभार करीत असताना नारद मुनी त्यांना भेटायला आले. नारदाला पाहून त्या दैत्य राजांना आनंद झाला. त्यांनी त्याचा सत्कार केला.

''मुनिराज, इकडे कसं येणं झालं?'' त्यांनी नम्रपणे विचारलं.

नारद म्हणाला, ''काय सांगावं? तुमच्याबद्दल मला वाईट वाटतं म्हणून मी तुम्हाला भेटायचं ठरवलं.''

''वाईट वाटतं? काय म्हणून? आम्ही तर सुखी आहोत.''

नारदाला त्या दैत्यांना चिथवायची संधी चालून आली. कलागत लावल्याशिवाय त्याला कुठलं चैन पडायला? तो म्हणाला, ''शुंभ महाराज, निशुंभ महाराज तुम्ही दोघे भाऊ सध्या त्रिभुवनाचे राजे आहात. कुबेर नि रत्नांचा निधी समुद्र हे तुमचे भांडारी आहेत. चतुरंग सैन्य तुमच्याजवळ आहे. पायांवर लढणारे पृथ्वीभरचे सैनिक, घोडदळ, हत्तींचं दळ नि रथाचं मोठं सैन्यबळ तुमच्याजवळ सतत सिद्ध आहे. पण तरी एक गोष्ट मात्र तुमच्याजवळ नाही म्हणून मला वाईट

वाटतं.''

''मुनिराज, कसली ती गोष्ट? सांगा, लवकर सांगा. आम्ही ती मिळवल्याशिवाय रहाणार नाही.''

''सांगतो. ऐका. तुम्हा दोघा भावांच्या ऐश्वर्याला साजेशी त्रिभुवनसुंदरी सहचरी एकालाही नाही. माझ्या नजरेस अशी एक देवता पडली आहे म्हणून मी सांगायला आलो.''

मग नारदानं कालिकेच्या एकेका अंगाचे सौंदर्य वर्णायला सुरवात केली. नारदाचा मंजुळ आवाज, त्याचे अजोड निरूपण ऐकून ते दैत्य डोलू लागले. नारद खूष झाला. मनातल्या मनात म्हणाला, ''बेट्यांनो, गेल्या जन्मी तुम्ही दोघंजण जालंधराचे साथीदार होता तेव्हा मायेची पार्वती निर्माण करून तुम्ही तिची शंकरासमक्ष विटंबना केली होती. त्यावेळी शंकरानं तुम्हाला शाप दिला, की तुम्ही मायेची पार्वती करून तिची विटंबना केलीत. पण लक्षात ठेवा, पुढे याच पार्वतीच्या हातून तुमचा मृत्यू होईल. तेव्हा शिरा मरणाच्या सापळ्यात!'' मग त्या दोघांना कालिकेला पट्टराणी करण्यात यश मिळावं असं चिंतून हसत हसत नारद तिथून बाहेर पडला.

झालं! कालिकेची आशा लागल्यामुळे ते दोघे दैत्य बंधू अगदी बेचैन होऊन गेले. कधी त्या त्रिभुवनसुंदरीचा लाभ होईल असं त्यांना झालं.

शुंभ दैत्य हा मोठा भाऊ. त्यानं सुग्रीव राक्षस या आपल्या विश्वासू राक्षसदूताला बोलावलं नि तो म्हणाला, ''सुग्रीवा, तू फार चतुर आहेस. तुझी वाणी मोहक आहे. तू मिठ्ठास बोलतोस. तुझ्यासारखा दुसरा दूत नाही. तू हिमालय पर्वतावर जा. तिथे कालिका नावाची त्रिभुवनसुंदरी आहे. तिच्याशी गोड बोलून तिला माझ्या रूपाचं, गुणांचं, वैभवाचं नि पराक्रमाचं वर्णन करून सांग, की या त्रैलोक्येश्वर शुंभ महाराजांची तू पट्टराणी हो. माझा गौरव ऐकून ती जर आली नाही, तर तिला बळजबरीने ओढून घेऊन ये.''

सुग्रीव राक्षस हिमालयावर गेला. कालिकेला पाहून त्यानं आदराने तिला वंदन केलं नि मग तो आपल्या शुंभ महाराजांचा गुणगौरव करू लागला. तो वर्णन करीत असता कालिका अधिकाधिक नाराज होत होती. चाणाक्ष सुग्रीवाच्या हे लक्षात आलं नि तो तिला म्हणाला, ''कालिके, तू मोठ्या भाग्याची म्हणून ही मागणी तुला आली आहे. शुंभ महाराजांबरोबर लग्न केलंस तर तूं स्वर्गातल्या अमरावतीची सम्राज्ञी होशील. इंद्राणीपेक्षा वरचढ. तू समस्त विश्वाची स्वामिनी होशील. जगातल्या सर्व रत्नांचा उपभोग तुला नित्य घेता येईल. यामुळे तुझ्या या सौंदर्याचं चीज होईल.''

कालिका हे ऐकून तुच्छतेनं हसून म्हणाली, ''अरे

सुग्रीवा, किती रे तू मूर्ख! कुठली वस्तू कुठे शोभेल याचं जरासुद्धा ज्ञान तुला नाही. अरे बावळटा! कमळाची कळी कुठे बेडकाला मिळेल का? मोत्याची माळ कुणी गाढवाच्या गळ्यात घालतं का? चंदनाचा टिळा डुकराच्या कपाळी कुणी लावतं का? हे बघ, कावळा कितीही लठ्ठ झाला तरी मोराची आणि त्याची बरोबरी कधीच होणार नाही. त्या प्रमाणेच तुझ्या शुंभाची नि माझी कधीच बरोबरी होणार नाही. मूर्खा, तुझ्या धन्याच्या वैभवामुळे त्याच्यासारखाच तू देखील मातला आहेस; त्यामुळे तुला योग्य काय नि अयोग्य काय तेही कळत नाहीसं झालं आहे. तू आलास तसाच परत जा नि आपल्या धन्याला माझा हा सर्व निरोप कळव."

कालिकेचं हे बोलणं ऐकून सुग्रीवाचा संयम सुटला रागानं दात ओठ खात तो म्हणाला, "उद्दाम कालिके! तू कुणाला हा निरोप पाठवते आहेस याची शुद्धबुद्ध तुला आहे का? अजून विचार कर. मी सन्मानानं तुला न्यायला आलो आहे. बघ, हे जर तुला पसंत नसेल तर मला तुला बळजोरीनं घेऊन जावं लागेल."

कालिका फार रागावली. मग तिरस्कारानं खोखो हसली आणि नंतर गंभीर स्वरात म्हणाली, "अरे मूर्खा, तू ज्या सैन्याची नि सेनानीची एवढी प्रौढी गायलीस त्या तुझ्या शुंभ राक्षसाला जर खरोखरीच माझ्याशी लग्न करायचं असलं तर त्यानं माझ्याबरोबर युद्ध करायला तयार व्हावं नि माझा



पराभव करून पहावं."

कालिकेचं हे निर्वाणीचं भाषण ऐकून दूत सुग्रीव गप्प झाला. निमूटपणे अमरावतीला जाऊन त्यानं सारी कहाणी शुंभ राक्षसाला सांगितली. शुंभ संतापला. त्यानं धूम्राक्ष नावाच्या राक्षसाला बोलावलं आणि "हिमालयावर जाऊन कालिकेला जबरदस्तीनं घेऊन ये." अशी आज्ञा केली.

कालिका आणि धूम्राक्ष

स्वामीने आज्ञा केल्याप्रमाणे धूम्राक्ष साठ हजार हत्तींचं सैन्य आणि प्रचंड पायदळ घेऊन कालिकेशी युद्ध करायला निघाला. त्याचे डोळे धूराप्रमाणे गढूळ होते. त्याच्या येण्याची वार्ता समजताच कालिकेनं आपल्या हजार हातात हजार आयुधं घेतली आणि ती सिंहावर स्वार झाली. हां हां म्हणता तिनं प्रचंड नि उग्र स्वरूप धारण केलं. तिचे हात तर समग्र विश्वाला कवटाळून धरता येण्याइतके लांब नि बलवान झाले. तिच्या मस्तकावरचा मुकुट ढगांपर्यंत पोचला. विक्राळ स्वरूपाच्या त्या कालिकेनं धुम्राक्षाला पाहून मेघगर्जनेसारखी गर्जना केली. त्या गर्जनेनं दाही दिशा दुमदुमल्या; समुद्र उचंबळला; पर्वत हादरले.

कालिकेचं विक्राळ स्वरूप पाहून नि गर्जना ऐकून धूम्राक्ष मनात दचकला; पण बाहेरून तसं न दाखवता त्यानं आपल्या सैन्याला कालिकेवर हल्ला करण्याचा इशारा दिला. कालिकेवर हजारो शस्त्र येऊन पडली. बाणांचा मारा

झाला; पण कालिका घाबरली नाही. तिनं आपल्या शस्त्रास्त्रांनी धूम्राक्षाच्या सैन्याला घायाळ केलं. तिच्या सिंहानं हजारो हत्तींची मस्तकं फोडली. धूम्राक्षाचं सैन्य नाहीसं होऊ लागलं. हजारो वीरांनी पळ काढायला सुरुवात केली. धूम्राक्ष देखील कालिकेला भिऊन पळून जात होता; पण सिंहानं त्याला अडवलं. देवीनं बाणांचा वर्षाव केला. शेवटी धूम्राक्ष व्याकुळ झाला. अखेर कालिकेनं आपल्या मुसळाचा घाव त्याच्या छातीवर घालून त्याला ठार केलं.

चामुंडा

धूम्राक्षाच्या सैन्यातून पळून आलेल्या पराभूत वीरांनी धूम्राक्ष मेल्याची वार्ता शुंभ-निशुंभ यांना सांगितली. ती ऐकून ते दोघे आणखीच चवताळले आणि त्यांनी चंड व मुंड या दोन बलाढ्य राक्षसांना कालिकेशी मुकाबला करायला पाठवलं. चंड नि मुंड पराक्रमी होते. त्यांना आपल्या बळाचा फार अभिमान होता. आपण कालिकेला बांधून आणू, असा भरवसा त्यांना होता. "महाराज, आम्ही कालिकेला आपल्यासमोर बांधून आणतो" अशी प्रतिज्ञा करून ते दोघे मोठ्या वीरश्रीने हिमालयावर आले.

चंड व मुंड यांनी एक युक्ती लढवली. आपल्या सैन्याच्या तुकड्या केल्या. वर्तुळाकार रचना केली. या तुकड्यांनी कालिकेभोवती फेर धरला आणि तिला वेढा घालून एकदम तिच्यावर हल्ला केला.

कालिका आता महाकालीच झाली. राक्षसांचा उन्मत्तपणा पाहून संतापली. तिचे डोळे विस्तवाप्रमाणे पेटून लाल झाले. तिचं तोंड राक्षसांच्या रक्तानं लाल झालं होतं. आपली लाल जीभ ती सारखी बाहेर काढून ओठांवरून फिरवीत होती. तिच्या गळ्यात नुकत्याच मारलेल्या राक्षसांच्या मुंडक्यांच्या माळा होत्या. ती सिंहाचं कातडं नेसली होती. हातातला त्रिशूळ ती गरगर फिरवीत होती. तिनं आपल्या त्रिशूळानं हजारो राक्षस मारले. पळून जाऊ पाहाणाऱ्या राक्षसांचा समाचार तिचा सिंह घेत होता. हाती लागेल त्या राक्षसाला कालिका पर्वतावर आपटून ठार मारू लागली.

राक्षसांचा संहार पाहून, चंड राक्षस कालिकेवर दात ओठ खात चालून आला. देवीनं आपला त्रिशूळ फेकून त्याची छाती फाडली. तो मरून पडताच त्याचं रक्त सिंह घटाघट प्यायला. यानंतर मुंड राक्षस चेवानं देवीवर चालून गेला. त्यानं एक पर्वत उचलून तिच्यावर फेकला. देवीनं पर्वताचं चूर्ण करून टाकलं नि आपलं वज्र राक्षसावर उगारलं. सिंहाला मद्य पाजून तिनं राक्षसाच्या अंगावर सोडलं. सिंहानं आपल्या तोंडात मुंडाला पकडलं. देवीनं लगेच वज्रानं त्याचं मस्तक तोडलं. याप्रमाणे चंड व मुंड राक्षसांचा वध केलेल्या कालिकेला चामुंडा हे नाव पडलं.

शुंभ निशुंभ यांचा वध

कालिकेनं त्यानंतर रक्तबीज या नावाच्या, शुंभाच्या राक्षस सेनापतीलाही मारून टाकलं. त्यानंतर शुंभ व निशुंभ निघाले. शुंभ तिच्यावर चालून गेला आणि प्रौढीनं म्हणाला, ''सर्व देवांना मी जिंकलं तिथे तुझा काय पाड?''

यावर कालिका तुच्छतेनं हसून म्हणाली, ''तुला माझ्याशी लग्न करायचं आहे ना? मग दाखव पराक्रम नि जिंक मला.''

दोघांचं तुंबळ युद्ध झालं. देवीचाच विजय होत गेला. तिच्या त्रिशुळाच्या प्रहारामुळे शुंभ बेशुद्ध झाला. तिच्या सिंहानं त्याच्यावर हल्ला केला. तरी पण तो सावध होता. उठून बघतो तर देवीनं निशुंभाला ठार केलं आहे नि सिंह त्याचं मांस खातो आहे. शुंभ संतापानं उठला नि फिरून युद्ध करू लागला; तेव्हा कालिका म्हणाली, ''अरे दुष्टा! तुझं लग्न आता रणभूमीबरोबरच लावून देते. तुझं रक्त हेच विवाहातलं उटणं; त्रिशूल हेच तुझं बाशिंग; यमदूत उचलून तुला नरकात नेतील, तीच तुझी वरात. माझी अभिलाषा धरलीस ना? त्याचं उट्टं आता काढते.''

कालिकेनं युद्धात त्याला ठार केलं तेव्हा देवांनी पुष्पवृष्टी करून तिचा जयजयकार केला.

पार्वती

पार्वती किंवा गिरिजा म्हणजे पर्वताची मुलगी. हा पर्वत म्हणजे दुसरा तिसरा कुणी नसून नगाधिराज हिमालयच. वेदात पार्वतीला 'उमा हैमवती' असं म्हटलं आहे. वेदात दुर्गा आणि अंबिका अशी देखील तिची नावं आढळतात; पण ती नावं 'ती शिवाची बायको आहे' या अर्थीच आलेली आहेत. अंबिका ही त्र्यंबकाची म्हणजे शिवाची बायको आहे नि बहीण पण आहे. दुर्गा ही शिवाची बायको आहे. रुद्राणी असं आणखी एक नाव रुद्राच्या म्हणजे शिवाच्या बायकोच्या संदर्भात वैदिक वाङ्मयात आढळतं.

पार्वती हिमालयाची मुलगी का नि कशी झाली? पार्वती म्हणजेच पूर्वजन्मीची सती. दक्ष प्रजापतीची यज्ञकुंडात उडी टाकून जळून मेलेली शिवाची पहिली बायको. पार्वती दुसरी.

तारकासुर हा राक्षस त्या काळी फार माजला होता. त्रैलोक्याला त्यानं गांजलं होतं. देवांना पराभूत केलं होतं.

तारकासुराला असा वर मिळाला होता, की त्याचा मृत्यु फक्त शिवाच्या मुलाच्या हातून होईल. अन्य कुणी, देव, दैत्य, वा मानव त्याला मारू शकणार नाही. शिव तर योगी. सदा तपस्येत गढलेला. सती आधीच मेली होती. शिवाचं सतीवर अलोट प्रेम होतं. त्याला संसाराबद्दल घृणा होती. वासना त्याला स्पर्शीतच नव्हती. स्त्रीची कल्पनाही त्याला सहन होत नव्हती. अशा विरागी पुरुषाला मुलगा कसा होणार? देवांना तर त्रिभुवनाच्या कल्याणासाठी शिवाला मुलगा होणं जरूरीचं वाटत होतं.

शिवाला वश करायला सतीनेच पुनर्जन्म घेणं आवश्यक होतं. पण सती आता नुसती सती राहिली नव्हती. ती आदिमाया किंवा महादेवी झाली होती. पत्नीपद स्वीकारायचं तर ते शिवाचंच अशी तिची धारणा होती.

देवांनी सतीची आराधना केली; स्तुती केली. तारकासुराच्या संकटाचं वर्णन केलं. त्याच्या वराची कल्पना तिला दिली आणि ते म्हणाले, "आदिमाये! तूच हे विश्वकल्याणाचं काम करायला समर्थ आहेस. तूच आमची तारक आहेस. शिवाला पुत्र झाल्याशिवाय तारकासुर मरणार नाही. तो जिवंत आहे तोवर जगात काही चांगलं होणार नाही. माते, तूच आमचं रक्षण कर आणि जन्म घे. तुझ्या शिवाय शिवाचं मन कोण जिंकू शकणार? कोण त्याची पत्नी होणार? आदिमाये, जगदंबे, तूच हे कठीण कार्य

अंगावर घ्यावस अशी आमची तुला प्रार्थना आहे." देवांची ही व्याकुळ प्रार्थना ऐकल्यावर जगदंबेनं अवतार घेण्याचं मान्य केलं.


हिमालयाची राणी मेना सतीची भक्त होती. त्यामुळे देवीने तिच्या पोटी जन्म घेण्याचं ठरवलं आणि हिमालयाची सुलक्षणी कन्या पार्वती जन्माला आली. पार्वती अत्यंत देखणी होती. ही मुलगी वर्णाने काळी म्हणून तिला काली म्हणत असत. हिमालयाचा जीव की प्राण अशी ही पार्वती होती. लहानपणापासूनच पार्वतीला शिवाबद्दल अपार भक्ती होती. शिवाच्या गोष्टी ती कान लावून ऐकायची. 'लग्न करीन तर शिवाशीच' असं तिनं बाळपणापासून ठरवून टाकलं होतं. शिव वृद्ध आहे; भिक्षेकरी आहे; मुंडक्यांच्या माळा गळ्यात घालतो; स्मशानात राहातो; मुलांबरोबर असतो; नागवा फिरतो; मोठ्या जटा वाढवतो; ओंगळ दिसतो, असं त्याचं वर्णन घरीदारी सारेजण करीत. पण त्याचा तिच्यावर काही परिणाम झाला नाही. शिवाचं वर्णन ऋषीमुनी करीत ते तिला आवडे. नारद मुनींच्या वर्णनावर ती खूष असे.

पार्वती मोठी झाली. तिच्या लग्नाचा विचार आईबाप करू लागले. त्यांना वाटे पार्वतीने विष्णूशी लग्न करावं. त्यांनी तिला आग्रह केला; पण तिचं म्हणणं एकच "मला शिवाशीच लग्न करायचं." आणि शिव तर असा

अवलिया! पार्वतीच्या आईनं परोपरीनं सांगितलं की शिव लग्नच करीत नाही; पण पार्वतीनं तोडगा काढला की मी त्याला तप करून वश करीन! आणि खरोखरीच ती तप करायला सिद्ध झाली. पार्वतीची आई हंबरडा फोडून 'उ – मा – अग नको –' असं म्हणाली. तेव्हापासून पार्वतीला 'उमा' असं नाव पडलं असं म्हणतात.

पार्वती जप करू लागली. देवांना हर्ष झाला. जिथे महादेव समाधी लावून बसला होता, तिथेच पार्वती तप करायला बसली. महादेवाला वाटलं की ही खुळी फुकट तप करते आहे. मग त्यानं जोग्याच्या रूपानं येऊन मुद्दामच शिवाची निंदा केली. त्यावेळी पार्वती फार चिडली आणि शिवावर माझं निर्भर प्रेम आहे असं तिनं सांगितलं. 'लग्न एक तर शिवाशी किंवा मृत्यूशी' हाच पण असलेल्या पार्वतीला शिवही बदलू शकला नाही.

पार्वतीची ती अविचल निष्ठा पाहून देवही स्तिमित झाले. त्यांची आशा पालवली. त्यांनी मदन आणि वसंत ऋतू यांना पार्वतीच्या मदतीला जाऊन शिवाला मोह पाडण्याचं कर्तव्य करायला सांगितलं. त्यांनी मान्य केलं. त्याप्रमाणे वनात वसंताचा संचार झाला. सृष्टी प्रफुल्लित झाली. मदनाने बाण सोडला. शंकराची समाधी भंगली. समोर सर्वांगसुंदर कोमल पार्वती होती. तिनं शिवाच्या चरणावर मस्तक टेकायला आणि मदनाचा बाण सुटायला



एकच गाठ पडली. शिव पार्वतीवर लोभावला. पण तेवढ्यात त्याचं लक्ष मदनाकडे गेलं. शिवाला संताप आला. त्यानं त्याचा तिसरा डोळा उघडला. त्या डोळ्यातल्या अग्नीनं मदनाला भस्म केलं. पण मदनानं आपलं कार्य आधीच केलं होतं.

हिमालयानं थाटामाटानं उमेचं लग्न शिवाशी लावून दिलं. ब्रह्मदेवानं पौरोहित्य केलं. लग्न झालं आणि पार्वती शिवाबरोबर त्याच्या घरी, म्हणजे गिरिगुहेत संसार करू लागली. एकमेकांवर अनुरक्त असलेलं हे जोडपं प्रणयक्रीडेत बुडून गेलं. काळ लोटत होता. यांचा एकांत संपत नव्हता. शेवटी देवांनीच त्यांच्या घरात प्रवेश केला.

पुढे शिवाचा मुलगा पोटात वाढवायला पार्वती समर्थ ठरली नाही. गंगेनं आणि सहा कृत्तिकानी त्याला वाढवला म्हणून त्याचं नाव कार्तिकेय पडलं. त्याला सहा तोंडं होती. कृत्तिकांनी त्याला दूध पाजलं म्हणून सहा आयांचा मुलगा असं बिरुद त्याला प्राप्त झालं.

कार्तिकेय अत्यंत सुंदर नि शूर होता. देवांचं कार्य त्यानं तडीला नेऊन तारकासुराचा वध केला. कार्तिकेय जरा मोठा होताच आई-बापांकडे आला.

पार्वतीचं कार्तिकेयवर फार प्रेम होतं. पण खरं लालन-पालन तिनं कुणाचं केलं असेल तर ते गणपतीचं. एकदा शंकर बाहेर गेला असताना पार्वतीला स्नान करायचं

होतं. तेव्हा तिथे कुणी येऊ नये म्हणून आपल्या अंगाचा मळ काढून तिनं त्या मळापासून एक मुलगा केला. ती स्नान करताना कुणी आल्यास कुणालाही आत सोडू नकोस असंही तिनं बजावलं. तो पहारा करीत असताना शिव आला नि आत जाऊं लागला. तेव्हा त्या लहानग्यानं त्याला अडवलं. शंकराला राग आला. त्यानं त्याचं मस्तक उडवलं. पार्वती बाहेर आली तर मुलगा बिचारा मरून पडला होता. शंकरही संतापला होता.

"हा कोण मला अडवणारा?" शंकरानं रागावून पार्वतीला विचारलं.

"तो माझा मुलगा होता." असं म्हणून सारी हकिगत सांगून पार्वती आक्रोश करू लागली. "माझा मुलगा जिवंत करा" असा हेका तिनं धरला. मुलाचं मस्तक तर भंगलं होतं. तेव्हा तिथे जवळच असलेल्या हत्तीचं मस्तक शंकरानं कापून त्या मुलाच्या धडावर बसवलं. म्हणूनच त्याचं नाव गजानन पडलं. गणेश, गणपती अशीही त्याची नावं होती. तो विद्या आणि कला यांचा प्रणेता निघाला.

शिव-पार्वती हे दांपत्य इतकं एकरूप झालं होतं की त्यामुळे 'अर्धनारीश्वर' हे बिरुद शिवाला प्राप्त झालं. एका शरीरात अर्धा भाग पुरुषाचा नि अर्धा नारीचा अशी आकृतीची संकल्पना तेव्हापासून या देशात रूढ झाली. शिव हा मुळात विरागी वृत्तीचा होता. त्याला संसारात

गुंतवून ठेवून जगाची निर्मिती करायला लावण्याचं मोठं कार्य पार्वतीनं पार पाडलं.

पार्वती, शंकर आणि भीम

पार्वती आणि शंकर हे जोडपं आपल्या भक्तांना तर वाटेल ती मदत करायला सदा सज्ज असेच; पण संकटात सापडलेल्या गरीबांसाठी पार्वतीचा जीव नेहमी तळमळे. अशा संकटग्रस्त गरिबांना पार्वती शंकरामार्फत मदत करायची. इथे तिनं भीम आणि पद्मावती यांना कशी मदत केली ते पाहू या. भीमानं मान-सरोवराला जाऊन तिथून सुवर्णकमळं घेतली आणि तो हस्तिनापुराला आला. ते पाहून दुर्योधनाला मत्सर वाटला. त्यानं भीमाला मारून टाकायचं ठरवलं. मग तो भीमाकडे गेला आणि म्हणाला, "भीमा, तू सुवर्णकमळं आणलीस हे पाहून मला किती आनंद झाला आहे म्हणून सांगू. मला तुझा फार अभिमान वाटतो. चल, मी आज मोठी पूजा करून तुला उत्तम भोजन देणार आहे."

भोळा भीम जेवायला गेला. पंगत बसली. वाढणारे लोक कौरवांच्या पानावर चांगले लाडू वाढीत नि भीमाच्या पानावर विषारी. भीमाला फार भूक लागली होती. लाडवांचा त्यानं फन्ना पाडला. ना कौरवांच्या आग्रहाला धरबंद होता ना भीमाच्या खाण्याला. जेवण आटोपल्यावर भीमाला पेंग आली. त्यानं अंथरुणावर अंग टाकलं.

भीमाचा दूत जेवायच्या वेळी हजर होताच. आता झोपायच्या वेळीही तो त्याच्यापाशी होता. संध्याकाळच्या वेळी भीमावर विषाचा अंमल चढला. अंग गार पडलं. ते पाहून तो दूत मोठ्यानं आक्रोश करू लागला. तो ऐकून गांधारी, भीष्म, द्रोण, विदुर वगैरे सारी मंडळी तिथे जमा झाली. भीम मेला आहे हे पाहून विदुर दुर्योधनाला म्हणाला, ''भीमाला विष घालून तू कपटानं मारलंस. याचा सूड अर्जुन उगवल्याशिवाय राहणार नाही.''

शकुनीमामा म्हणाला, ''भीम विषामुळे मेला. पण तो सापाच्या विषानं मेला असं आम्ही सिद्ध करू.''

विदुरानं भीम मेल्याची वार्ता पांडवांना सांगितली. त्यांचं सांत्वन केलं. मग भीमाचं प्रेत भागीरथी नदीत सोडण्यात आलं. ते वाहात दूर गेलं. असंच वाहात वाहात भीमाचं प्रचंड पर्वतासारखं प्रेत भागीरथीच्या काठी गेलं. तिथे भीम पती मिळावा म्हणून पद्मावती तप करीत होती.

कोण ही पद्मावती ? ती का तप करीत होती ? पद्मावती ही वासुकी नागराजाची कन्या. ती पूर्वजन्मी कश्यपाची ज्योती नावाची मुलगी होती. सुशील पती मिळावा म्हणून ती भागीरथीच्या तीरी तप करीत ध्यानस्थ बसली होती. तेवढ्यात मनु ऋषी भिक्षेसाठी तिच्याकडे आले, आणि ''भिक्षा दे'' असं म्हणाले. पण ज्योती ध्यानात मग्न झाल्यानं तिनं भिक्षा वाढली नाही. त्यावेळी ऋषींना क्रोध



आला नि त्यांनी तिला "तू मरून पृथ्वीवर जाशील आणि तुझं लग्न प्रेताबरोबर लागेल" असा शाप दिला.

शाप ऐकल्यावर ज्योती जागी झाली. तिनं क्षमा मागितली. तेव्हा मनु ऋषींना तिची दया आली. ते म्हणाले, "पुढच्या जन्मी तू पार्वतीची आराधना कर, म्हणजे तुझं भीम या पांडवाशी लग्न होईल."

मग ज्योतीनं वासुकीच्या पोटी जन्म घेतला. तिनं पार्वतीची आराधना केली. पार्वती तिच्यावर प्रसन्न होऊन म्हणाली, "पद्मावती, भिऊ नको. मनुनं सांगितल्याप्रमाणे तुझं मृत भीमाशी लग्न होईल. भीमाचं प्रेत इथं वाहात येईल. त्याच्याशी तू लग्न कर. मी तुला अमृताची कुपी देते. तू ते अमृत भीमाला पाज. तो जिवंत होईल."

जेव्हा पद्मावतीला नदीतून प्रचंड प्रेत वाहात येताना दिसलं, तेव्हा तिनं पार्वतीची प्रार्थना केली, की "आदिमाते पार्वती, हे प्रेत भीमाचं असलं तर किनाऱ्याला लागू दे. दुसऱ्या कुणाचं असलं तर पुढे वाहात जाऊ दे." प्रेत किनाऱ्याला लागलं. कन्येच्या इच्छेप्रमाणे वासुकीनं थाटामाटानं तिचं लग्न मृत भीमाशी लावून दिलं. मग पार्वतीनं दिलेलं अमृत पद्मावतीनं भीमाच्या मुखात घातलं नि तो जिवंत झाला.

आपण कौरवांच्या घरी जेवलो नि आता इथे कुठे आलो ते भीमाला कळेना. पद्मावतीनं त्याला सारी हकिगत

सांगितली. ती ऐकून भीम म्हणाला, "पद्मावती, अमृत कसं असतं ते मला पाहायचं आहे. दाखव ना!"

पद्मावती म्हणाली, "मी सारं अमृत तुमच्या तोंडात घातलं. आता काय दाखवू?"

"पण पद्मावती, पाताळात अमृतकुंडं आहेत असं मी ऐकलं आहे. ती मला दाखव."

"होय आहेत. अमरगिरीवर पाच अमृतकुंडं आहेत. पण त्यातलं अमृत घेण्याचा अधिकार आम्हाला नाही. ती कुंडं शंकराच्या मालकीची आहेत. घोर सर्पांचा पहारा त्यांच्यावर असतो," पद्मावती विचार करीत म्हणाली. यावर भीम काही बोलला नाही. पण अमृत त्याच्या डोक्यातून जाईना.

पद्मावतीच्या विवाहानिमित्त वासुकीनं लग्नमंडपात भोजनाचा थाटमाट केला. भीम जेवायला बसला. सगळ्यांनी त्याला आग्रहानं जेवायला घातलं. भीमाचं खाणं संपेचना. मंडपातले वासुकीचे नाग-सेवक भीमाचा अचाट आहार पाहून हसू लागले. भीमाला ते आवडलं नाही. जेवण उरकून तो उठला.

जेवताना भीमाबरोबर मोठमोठे सर्पही गुंग झाले होते. ते जेवणात रंगले आहेत, त्यांचं खाणाऱ्याकडे लक्ष नाही असं पाहून भीम हळूच तिथून सटकला नि अमर पर्वताकडे गेला. भरपूर अमृत प्यायचं त्याच्या मनात होतं.

अमर पर्वतावर नागांचा पहारा होता. भीमाला पाहून ते म्हणाले, "भीमा, वासुकी राजाचा जावई म्हणून तुला इथवर येऊ दिलं. जा, मागे फिर."

"मी अमृत पिऊनच जाईन. तुम्ही मला काही करू शकत नाही" असं म्हणून भीम पुढे सरसावला. नागही कमी नव्हते. तेही त्याच्यावर हल्ला करायला धावले. पण भीमानं त्यांना दूर फेकून दिलं. हजारो सर्पांना मारलं.

ही गोष्ट वासुकीच्या कानी गेली तेव्हा तो सर्पांना म्हणाला, "तुम्ही जेवताना त्याची चेष्टा केली त्याचं हे फळ आहे."

भीम आवरत नाहीसं पाहून शेष नि तक्षक नाग यांनी भयंकर कालकूट विष भीमाभोवती ओकायला सुरुवात केली. पण पोटात अमृत असल्यामुळे विषाचा त्याच्यावर परिणाम होईना.

वासुकीला काळजी पडली. त्यानं शंकराकडे जाऊन सारं वर्तमान सांगितलं. शंकरही चिंतेत पडला. "पार्वती, तुझ्यापायी हा अनर्थ ओढवला," तो संतापून म्हणाला.

पार्वती शांतपणे म्हणाली, "मी पद्मावतीला दिलेल्या अमृतामुळे तो सर्वांना अजिंक्य झाला आहे. पण घाबरण्याचं कारण नाही. ते अमृत काढून घेतलं, की त्याला सहज जिंकता येईल. शंकरा, तुम्ही वाघाचं रूप घ्या नि मी गाय होते. मी तुमच्या भयाने भीमाजवळ जाऊन उभी

राहीन. तेव्हा तुम्ही डरकाळी फोडा. ती ऐकून तो बेशुद्ध पडेल. मग तुम्ही आपल्या नखांनी त्याचं पोट फाडून अमृत काढून घ्या. मग तर झालं?"

शंकराला आनंद झाला. वाघ होऊन तो गायीच्या मागे लागला. गाय भीमाजवळ येऊन डोळ्यातून पाणी गाळीत थरथरत उभी राहिली. तेवढ्यात वाघ मागोमाग आला. गायीला संरक्षण द्यायचं म्हणून भीम वाघावर चालून गेला. इतक्यात भयंकर गर्जना करीत वाघानं त्याच्या मागे उडी घेतली. त्याची गर्जना ऐकून भीम घाबरून बेशुद्ध पडला. वाघानं पोट फाडून अमृत काढून घेतलं. तेवढ्यात भीम सावध झाला. समोर शिव-पार्वती उभी पाहून भीम लाजला आणि त्यांना शरण गेला. शंकरानं प्रसन्न होऊन त्याच्या पोटावर हात फिरवून तो भाग वज्रासारखा कठीण केला. मग भीमानं शिवाजवळून वर घेतला की त्याच्यासारखा सिंहनाद — गर्जना — आपल्याला प्राप्त व्हावी. शिवानं वर दिला. तेव्हापासून भीमाच्या गर्जनेमुळे शत्रू नामोहरम होऊ लागले.

एकूण काय, पार्वतीनं पद्मावतीला वर दिला; पण भीमाची बळजोरी चालू दिली नाही. दुर्गुणांचं दमन करण्याची तिची शक्ती तिनं चतुरपणे वापरली. पतीवर कुणाचाही वरचष्मा होऊ नये म्हणून ती सतत जागरूक राहिली.

दरिद्री ब्राह्मण

पार्वतीला दीनजनांबद्दल येणारा कळवळा व शंकरामार्फत विनंती करून त्यांना साहाय्य करण्याची तिची प्रवृत्ती, भारतभरच्या लोककथांत दिसून येते. इथे एकच गोष्ट वानगीदाखल पाहू या. एक दरिद्री नि कमनशिबी ब्राह्मण होता. त्याला बुद्धीही नव्हती. घरात बायको नि मुलं. संसारात अठरा विश्वे दारिद्र्य. एक दिवस बायको त्याला खूप बोलली नि "कुठेही जा; पण काही तरी मिळकत केल्याशिवाय परत येऊ नका," असं म्हणाली. याला कोण काय देणार? तो एका झाडाखाली रडत बसला. त्यावेळी शंकर-पार्वती आकाशातून चालली होती. पार्वतीला त्याची दया आली.

"का रडतोस रे बाबा?" पार्वतीनं त्याला विचारलं.

ब्राह्मणानं आपली कर्मकहाणी सांगितली. पार्वती शंकराला म्हणाली, "द्या बिचाऱ्याला काही तरी. उपासमार थांबू द्या."

शंकराजवळ तीन मडकी होती. त्यातलं एक त्यानं ब्राह्मणाला दिलं नि म्हणाला, "हे मडकं हलव, म्हणजे डाळ कुरमुरे पडतील. उपडं घाल की पडायचे थांबतील. कुरमुरे विकून पोट भर."

ब्राह्मण घरी आला. मडक्यामुळे त्याच्या कुटुंबाला चांगले दिवस आले. एक दिवस ते मडकं एका वाण्यानं

पळवलं नि दुसरं त्याच्या जागी ठेवलं. ब्राह्मणाला पुन्हा दारिद्र्य आलं. तो परत झाडाखाली रडत बसला. परत पार्वतीला दया आली. तिनं पतीला दुसरं मडकं द्यायला लावलं. तो घरी जात असताना त्या लबाड वाण्यानं त्याला आपल्याकडे रात्री ठेवून घेतलं. या मडक्यातून पंचपक्वान्नं पडत होती. ब्राह्मणानं वाण्यानं बदललेलं मडकं हलवलं, तर त्यातून काही पडेना. फिरून ब्राह्मण रडत बसला. फिरून पार्वतीला दया आली. शंकराकडून तिनं तिसरं मडकं त्या ब्राह्मणाला देववलं. "या मडक्यातून सोटा घेतलेलं भूत निघेल नि तुझी मडकी घेणाऱ्याला बदडून काढील. जा, सुखात राहा," पार्वती म्हणाली.

मग ब्राह्मण मुद्दामच त्या रात्री वाण्याकडे मुक्कामाला राहिला. वाण्याकडे पंचपक्वांन्नांची मेजवानी चालली होती. तिसरं मडकं मिळेल म्हणून वाणी आनंदला. रात्री ब्राह्मणानं झोपेचं सोंग घेतलं. तो निजलाय असं पाहून वाण्यानं मडकं बदललं. नंतर तो घरात आला नि त्यानं मडकं हलवलं तर आतून सोटा घेतलेलं भूत आलं नि वाण्याला नि त्याच्या माणसांना बदडीत सुटलं. मग ब्राह्मण उठला. ब्राह्मणाला पाहिल्यावर भूत म्हणालं, "याचा मी नोकर." वाणी ब्राह्मणाच्या पाया पडला. मग त्यानं ती दोन्ही मडकी वाण्याकडून काढून घेतली. त्यानंतर मात्र ब्राह्मणाला कधीही कसलाही त्रास झाला नाही. पार्वतीच्या कृपेनं तो

ब्राह्मण नंतर कायम सुखात राहिला.

शिव पार्वतीची भांडणं

शंकर-पार्वती हे एकच जोडपं असं होतं की ते सतत सारीपाट खेळायचं. वेरूळच्या लेण्यात, कैलास पर्वतावर सारीपाट खेळणाऱ्या शिव-पार्वतीचं अप्रतिम शिल्प आहे. पार्वती खेळण्यात फार हुशार होती. शंकर बहुधा हरणार हे ठरलेलंच असे. पण खेळात हरल्यावर तो चिडायचा आणि निघून जायचा. मग पार्वती त्याला हुडकीत हिंडायची. खेळावरून ती दोघं नेहमी भांडायची.

एका लोककथेत असं म्हटलं आहे की खेळताना शंकराला संशय यायचा, की पार्वती लबाडी करते आहे. मग तिच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी त्यानी आपल्या केसातून एक बाहुला काढला नि त्याला पार्वतीवर नजर ठेवायला सांगितलं. पार्वती संतापली. तिनं आपल्या अंगाच्या मळातून बाहुली निर्माण केली. शंकराच्या बाहुल्याचं नाव राम, तर पार्वतीच्या बाहुलीचं नाव सीता. राम शंकराची बाजू घेऊ लागला की सीता पार्वतीची बाजू घ्यायची. मग त्या दोघांचं चांगलंच भांडण जुंपायचं. हे भांडण लागलं की शिव-पार्वती आपसात दिलजमाई करायची.

एरवी सुद्धा शंकर-पार्वतीचं कशा नि कशावरून भांडण

व्हायचं. भारतभर त्यांच्या भांडणाच्या कथा पसरल्या आहेत. एकदा असंच शंकर व पार्वतीचं भांडण झालं नि गंगेला बरोबर घेऊन शंकर कुठेतरी निघून गेला. पार्वती त्याला शोधीत भटकू लागली. अखेर ती थकली नि कामरूप या ठिकाणी कामाख्या देवी म्हणून राहिली. नंतर विष्णु एकदा भटकत भटकत तिथे आला आणि म्हणाला, "पार्वती? तूं इथे?" तेव्हा पार्वतीनं आपण इथे कां आलो ते सांगितलं. शंकर देखील लिंगातून डोकावून हसू लागला.

बांगडीवाल्याची गोष्ट

बंगालमध्ये ही बांगडीवाल्याची गोष्ट फार लोकप्रिय आहे. एकदा दुर्गेचं – पार्वतीचं – शिवाशी कडाक्याचं भांडण झालं. एक दिवस पार्वतीला लक्ष्मीनं डिवचलं, "माझ्या अंगावर बघ कसे अलंकार आहेत ते. तुझ्या अंगावर काही नाही. तुझा नवरा भीक मागतो. तो काय देणार?"

हे बोलणं दुर्गेला लागलं. तिनं शंकराजवळ 'रत्नजडीत बांगड्या द्या' म्हणून हट्ट धरला. शंकर म्हणाला, "मी भिकारी, मी काय देणार? माझ्या जवळ फक्त हा शंख आहे. हिरे मोती कुठून आणू?"

तरीही पार्वती ऐकेना. ती हटून बसली. शिव कंटाळून चालता झाला. पार्वती देखील माहेरी गेली. हिमालय बापानं

नि मेना आईनं समजूत घातली. ''हट्टानं त्या जोगड्याशी लग्न केलंस. तो काय देणार?'' असंही आई म्हणाली.

यावर पार्वती आणखीच चिडली. ''मी नाही तुमच्याजवळ दागिने मागत. असू दे आमचा नवरा भिकारी. मला हवी तशी कांकणं मला मिळतीलच.'' असं फणकाऱ्यानं म्हणून गौराबाई अंगणाच्या एका कोपऱ्यात फणफण करीत बसल्या. थोडावेळ गेला असेल, तोच एक बांगडीवाला ''बांगड्या घ्या, बांगड्याऽऽऽऽ. लाख मोलाच्या बांगड्या. कुणाला फुकट तर कुणाला विकत'' असं म्हणत दाराशी आला. बांगडीवाला म्हातारा होता. त्याच्या दाढी मिशा पांढऱ्या होत्या. केसांच्या जटा झाल्या होत्या.

''बांगड्या घ्या'' असा पुकारा ऐकताच पार्वती फक्त स्त्री झाली. हौशी स्त्री. ती सारं दुःख विसरली. अपमान विसरली. ''ए बांगडीवाल्या, इकडे ये.''

''कोण बोलावतं आहे?'' बांगडीवाल्यानं विचारलं.

''मी,'' पार्वतीनं उत्तर दिलं.

''मी म्हणजे कोण ते सांग. त्या शिवाय मी येणार नाही. बायकांचा काय नेम सांगावा?''

''अरे कासारा, मी भवानी. शिवाची बायको पार्वती. मला दुर्गा म्हणतात.''

''वा! वा! मोठंच गिऱ्हाइक मिळालं. हिमालय बाबा

आहेत ना. देतील मोल. म्हणूनच इथे आलो'', बांगडीवाला आनंदून म्हणाला.

''काही नको त्यांचे पैसे,'' पार्वती रागावून म्हणाली.

''कांकणं हवीत का नकोत?'' बांगडीवाल्यानं विचारलं.

''कांकणं हवीतच,'' पार्वती हट्टी स्वरात म्हणाली.

''ठीक आहे. देऊ भवानीला. बघा ही कांकणं. शंखाची आहेत हो! मी गरीब बांगडीवाला. रत्नांची काकणं कुठून आणू? आणि ही बघा, एकच उत्तम जोडी आहे.''

पार्वतीनं पाहिलं तर ती शंखाची सौभाग्य-कांकणं सोन्यामोत्याच्या कांकणांना मागे टाकणारी होती. त्यांचं तेज चंद्र-सूर्य एक केल्यासारखं सुंदर नि मोहक होतं. घडण तर किती सुबक म्हणून सांगावी? ती काकणं पार्वतीच्या मनात भरली. 'घ्यावी की न घ्यावी?' पार्वती विचार करायला लागली. 'किंमत कितीतरी असेल. कुठून आणावेत पैसे? फुकट घेतली तर नवऱ्याला बट्टा लागेल. लग्न झालेल्या मुलीनं बापाकडून काही न घेतलेलं बरं. पण कांकणं कशी झळकताहेत. माझ्या गोऱ्या हातांना किती साजून दिसतील.' असे विचार मनात येऊन पार्वती गप्प बसली. तिची नजर मात्र कांकणांवर खिळून राहिली ती राहिलीच.

तो लंगोटी लावलेला कासार म्हणाला, ''बाई किती वेळ झाला. लौकर सौदा पटवा नि मला मोकळं करा. मी गरीब

माणूस. दुसरीकडे कांकणं विकीन.''

"छे! छे! कासारा, जाऊ नको. अशी कांकणं मी कुठेच पाहिली नाहीत. लक्ष्मीच्या हातात सुद्धा असा चुडा नाही.'' पार्वती आपल्याशीच बोलत होती.

"बाई, लवकर सौदा करा. नाहीतर मी लक्ष्मीकडेच जातो कसा. तिथे क्षणभरात सौदा होईल. पण मला म्हाताऱ्याला वाटलं की शिवाच्या दुर्गेच्या हातात हा चुडा पडला तर मला आनंद होईलच, पण शिवालाही होईल. नाही का? पैशाचं आपण मागाहून पाहू.''

काही झालं तरी हा शंखचूडा आपण मिळवलाच पाहिजे या ईर्ष्येने पार्वती म्हणाली, "कासारा, मी घेते हा चुडा. पण दाम मात्र आताच देणं व्हायचं नाही रे. मग दिले तर चालतील? या चुड्याचं मोल काय?''

"बाई, चुडा पृथ्वीमोलाचा आहे. सर्वांच्या हातात तो जायचाच नाही. जिच्या हातात जाईल तिलाच तो द्यायचा असं मी आधीच ठरवलं होतं. करा हात पुढे. बघू होतो का?''

पार्वतीनं हात पुढे केला. म्हाताऱ्या कासारानं तिचा मऊ हात हातात घेऊन दाबला. किंचित् हसून त्यानं चुडा तिच्या बोटांत सारला. पार्वतीला हे त्याचं वागणं आवडलं नाही; पण कासार हात सोडीना. तिचा हात घट्ट दाबून चुडा चढवीत तो म्हणाला, "काय हे खरखरीत, कठीण हात. भिकारी शंकराच्या घरी भांडी घासून, जमीन सारवून आणखी काय होणार?''

हे ऐकून पार्वती संतापली. हात मागे घेऊ लागली. पण कासाराची पकड बळकट आणि सोबत वटवट.

"हात आखडू नका. आधीच कडक आहे. चुडा जाईलसं वाटत नाही. पण बघतो प्रयत्न करून.''

"नको मला चुडा. शंकर म्हणत होते तर ऐकलं नाही आणि आता फशी पडले. सोड माझा हात'' असं म्हणून पार्वती रडत रडत हात सोडवायचा प्रयत्न करू लागली.

"झालं. आता एकच कळ. चुडा जाईलसं वाटतं आहे.'' बांगडीवाला पार्वतीचा हात न सोडता म्हणाला.

"मेल्या! हात सोड रे. शिवशंकरा धावा! धावा! पार्वतीनं शिवशंकराला हाका मारल्याबरोबर चुडा हातात गेला. हात कसा लखलखत होता, पण तरी कासार हात सोडत नव्हता.

"कासारा! हात सोड. बाबांकडून चुड्याचं मोल घेऊन येते. हात सोड,'' पार्वती संतापानं थरथरत उद्गारली.

"नाही सोडणार हात. जिला चुडा भरीन तिचंच मोल घेईन. पृथ्वीचं मोल चुड्याचं आहे असं मी आधीच सांगितलं नव्हतं का? पार्वतीचं नि पृथ्वीचं मोल एकच आहे.''

"हाय रे दैवा!'' असं म्हणून पार्वतीनं रडायला सुरवात

केली. ती मूर्छित पडली. जरा शुद्धीवर आल्यावर बघते तर कासार कुठे दिसेना. दोन्ही हात चुड्यानी भरलेले आणि शिवशंकर तिचं मस्तक मांडीवर घेऊन बसलेले. "पार्वती, उठ. तुला चुडा हवा होता ना? देतेस ना तुझं मोल? तुझ्याशिवाय जराही करमेना म्हणून आलो इथे. चल आता आपल्या घरी," पार्वती जागी झाल्याचं पाहून शिवशंकर मिश्किल हसत म्हणाले.

घरी येताना पार्वती लक्ष्मीलाही हेवा वाटेल असा आपला शंखचूडा सारखा निरखितच होती. तिच्या चेहऱ्यावर आनंद मावत नव्हता आणि शिवाच्या हसण्याला खळ नव्हता.

भिल्लिणीची गोष्ट

शंकर-पार्वतीच्या भांडणाच्या गोष्टीत भिल्लीणीची गोष्ट फार मजेची आहे. शंकर पार्वती सारीपाट म्हणजे सोंगट्या खेळत असत हे आधी सांगितलंच आहे. ती दोघं पण लावून खेळायची. एकदा ती दोघं खेळत असताना पार्वतीनं शंकराचा त्रिशूळ, डमरू, नंदी, नरसंड माळा, वासुकीहार, अलका, कुबेर, व्याघ्रांबर, कमंडलू, हत्तीचं कातडं, भिक्षेची झोळी अशा एकेक करत सर्व वस्तू जिंकून घेतल्या. शेवटी महादेव रागावला आणि कमरेची लंगोटी त्यानं पणाला लावली. तीदेखील पार्वतीनं जिंकून घेतली.

तेव्हा शंकर तिला म्हणाला, "पार्वती, तू आणखी एक डाव माझ्या बरोबर खेळ. तो डाव जिंकलास, तर मी तू जिंकलेलं सर्व तुला देईन."

तेव्हा पार्वती म्हणाली, "देवा, आता तुमच्याजवळ पणाला लावायला राहिलंच आहे काय? म्हणून मी तुमच्याबरोबर खेळत नाही."

शंकर म्हणाला, "तू खेळली नाहीस, तर तूं जिंकलेलं काहीही मी तुला देणार नाही."

हे ऐकून पार्वतीला राग आला. आपल्या सख्यांना बोलावून तिनं शंकराच्या साऱ्या वस्तू काढून घेतल्या. अलका ही यक्षांची नगरी कुबेरासकट आता पार्वतीची झाली.

सारं काही पार्वतीनं काढून घेतलेलं पाहून शंकरानं लंगोटी सुद्धा काढून फेकून दिली. रागारागानं कैलास पर्वत सोडून तो दुसरीकडे निघून गेला.

त्यांचा खेळ बघत नारद तिथेच बसला होता. ही मजा पाहून तो आनंदानं नाचू लागला. पुढे काय होतं ते बघावं म्हणून तिथेच बसून राहिला.

पण दिवसांवर दिवस लोटले तरी शंकर आला नाही. थट्टेचा हा भलताच परिणाम झालेला पाहून पार्वतीला पश्चात्ताप झाला. नारद गंभीर तोंड करून येरझारे घालीत राहिला होता. त्याला पार्वती म्हणाली, "नारदा, चल.

आपण महादेवांची समजूत घालून त्यांना परत आणूया.''

नारद म्हणाला, ''पार्वती, तू अशीच शंकरांकडे गेलीस, तर ते फार रागावतील. त्यापेक्षा तू भिल्लीणीचा वेष घे नि जा. महादेव सह्याद्रीवरच्या जंगलात तप करीत बसले आहेत.

पार्वतीनं भिल्लीणीचा वेष घेतला. हातात धनुष्य-बाण घेतला. मोरपिसे डोकीला नि कमरेला बांधली. गुंजांचे हार गळ्यात घातले. कानांवर फुलं ठेवली. केसाची सुरेख वेणी घातली. तिच्यात केवड्याची पानं खोचली. उत्तम वस्त्र नेसली. मग सजून नटून, लाजत मुरकत, नाचत खेळत, गाणं गात ती महादेव बसला होता त्या वनात गेली. शिवात ती इतकी गुंतून गेली होती, की नारदाने केव्हा पोबारा केला तेही तिला कळलं नाही.

त्यावेळी वसंत ऋतू होता. झाडं फुलांनी भरली होती. सर्वत्र सुगंध दरवळत होता. पक्षी गात होते. पण महादेव मात्र ध्यानस्थ होता. त्याच्यासमोर उभी राहून पार्वती मल्हार राग गात, पैंजणांचा झंकार काढीत नाचू लागली. तिचं मधुर गाणं ऐकून महादेवाची समाधी भंगली. त्यानं डोळे उघडले आणि भिल्लिणीकडे पाहू लागला. हे पाहून भिल्लीण नखरेल हावभाव करू लागली. तिचं मोहक रूप, सुरेल गाणं नि आकर्षक नृत्य पाहून शंकर खुळावला. तिच्याकडे टक लावून पाहात म्हणाला, ''भिल्लिणी, जरा स्थिर उभी

राहा. माझ्याशी दोन शब्द बोल. सुंदरी, तू कुणाची कोण ते मला सांग पाहू. माझा तू स्वीकार कर.''

पण शंकराशी काही न बोलता पार्वती तशीच हळूहळू पुढे चालू लागली. मग शंकरही उभा राहिला आणि तिच्या मागोमाग जाऊ लागला. भिल्लिणीनं सर्व अरण्यात, आणि पर्वताच्या दऱ्याखोऱ्यातून शंकराला फिरवलं. शेवटी तो थकला तेव्हा ती उभी राहिली. मग शंकर आर्जवी स्वरात म्हणाला, ''सुंदरी, कृपा कर. तुझ्या मागे हिंडता हिंडता मी थकून गेलो आहे. मी त्रैलोक्याचा ईश्वर शंकर आहे. माझा स्वीकार केल्यानं तुला मुळीच कमीपणा येणार नाही.''

भिल्लीण म्हणाली, ''शंकरा, तुम्ही रागीट स्वभावाचे आहात असा बोभाटा मी ऐकला आहे. तुम्ही आपल्या बायकोला टाकून जसे इकडे तिकडे हिंडता, तसेच मलाही सोडून जाणार नाही कशावरून? तिच्यासारखी माझी पण दुर्दशा कराल. तेव्हा राग सोडून तुम्ही मला कधी अंतर देणार नाही असं कबूल करीत असाल तरच मी तुम्हाला वरीन. आणखी माझी एक अट आहे; जर तुम्ही पार्वतीवर रागावलात तर मी तुम्हाला सोडून जाईन.''

शंकरानं साऱ्या अटी कबूल केल्या; तेव्हा भिल्लिणीनं फुलांची माळ त्यांच्या गळ्यात घातली. मग शंकरानं तिला आपल्या मांडीवर बसवलं नि तिच्याकडे पाहिलं तर काय? तिच्या जागी पार्वतीच त्याला दिसली. शंकर बिचारा

शरमला. मग पार्वती म्हणाली, "देवा, तुम्हाला जिंकू शकेल अशी कोण स्त्री माझ्याशिवाय आहे बरं? तुम्ही रागावून गेलात म्हणून मला अशा तऱ्हेनं तुम्हाला प्रसन्न करून घ्यावं लागलं. मला क्षमा करा."

मग ती दोघं हसत-खेळत कैलासावर परतली. नारद दारात स्वागत करायला होताच. त्याला पाहून पार्वती म्हणाली, "चल मेल्या! तू आहेसच का इथे?"

कालीची गौरी

शंकर-पार्वती यांचे वादविवाद अखंड चालत; खटकेही उडत. पण एक भांडण मोठं गमतीचं आहे. शंकर गोरा; पार्वती काळी; म्हणून तिला लोक काली म्हणत. शंकरसुद्धा तिला काळी म्हणून चिडवायचा. "मी बघ कसा गोरापान नाही तर तू काळीढुस्स!" असा टोमणा अनेकदा मारायचा. एकदा शंकर चेष्टेनं म्हणाला, "तू ही अशी काळीकुट्ट. माझा रंग किती गोरा आहे. मीच होतो म्हणून तुझ्याशी लग्न केलं." ही थट्टा पार्वतीच्या जिव्हारी लागली.

"आता गोरी होईन तरच घरी येईन. गेले मी." असं म्हणून पार्वती रडत, फणफणत घराबाहेर पडली. भागीरथीच्या काठी ती तपश्चर्या करू लागली. पण कुठल्या देवाची किंवा देवीची आराधना करायची ते तिला कळेना. शंकराचंच मुख तिच्या डोळ्यासमोर येई. शंकराचा

चेहरा सुंदरच होता. त्याचंच वेड लागून तर पार्वतीनं त्याला वरलं होतं. त्यामुळे आताही शिवाचीच आराधना तिनं आरंभली. "काळी म्हणता ना? मग करा मला गोरी." अशा निर्धारानं तिनं उग्र तप आरंभलं. ती घरातून गेल्यावर शिवाला तरी कुठलं चैन पडायला? पण पार्वतीला काळेपणाचं वैषम्य वाटलं म्हणून तिनं तप आरंभलं आहे असं कळताच सारे देव चिंतेत पडले. सतीची कथा नि नंतरचा प्रलय त्यांना आठवला. पार्वतीचा निर्धार म्हणजे पक्का निर्धार. शिवाशी भांडण होऊनही पार्वतीनं घोर तप करताना शंकराचीच आराधना चालवली होती. हे सर्व पाहून देवांना जरी नवल वाटलं तरी पार्वतीचा प्रश्न केवळ शंकरच सोडवू शकतो हेही त्यांना माहीत होतं. त्यामुळे सारे देवगण शिवाकडे गेले आणि म्हणाले, "महादेवा, पार्वतीदेवीचं तप तिची इच्छा पूर्ण करून तूच थांबवू शकतोस. तू तिचा रंग पालट."

"ठीक आहे," शंकर म्हणाला, "पण पार्वती आदिशक्ती आहे. अदितीचं ती दुसरं रूप आहे. तेव्हा तिचा नुसता रंगच नाही तर तिची सगळी बाह्याकृती काढून टाकावी लागेल. ही बाह्याकृती सोडायची वेळ आता आली आहे."

"ती कशी?" देवांनी विचारलं.

"सध्या दैत्यांनी धुमाकूळ मांडला आहे. देव हो, तुम्ही

जाणता की शुंभ-निशुंभा सारख्या राक्षसांनी इंद्रालाही हटवलं आहे. या राक्षसांचा निःपात झाला पाहिजे आणि आताच नाही तर वारंवार झाला पाहिजे. पार्वतीची कातडी महाशक्तिशाली आहे; विनाश करायचं नि विनाश थांबवायचं अपूर्व सामर्थ्य त्या त्वचेत आहे. संहाराची ती देवता आता अवतरायलाच हवी आहे'', शंकर ठाम स्वरात बोलला.

यानंतर पार्वतीच्या आराधनेला यश येऊन शंकरानं तिला दर्शन दिलं नि तिची कामना पूर्ण केली. पार्वतीची काळी कातडी दूर झाली. पार्वती गोरीपान झाली. गोऱ्या शिवाची गोरी शिवानी गौरी हे नाव देवांनी तिला दिलं.

पण तिची काळी प्रकृती? ती युद्ध करणारी संहारदेवता कालिका, महाकाली, दुर्गा, चंडिका या नावांनी प्रसिद्ध झाली. उमा, गौरी, पार्वती ललिता वगैरे सौम्य पार्वतीची नावं आहेत. दुर्गा हे नाव मात्र तिच्या दोन्ही स्वरूपांना लावतात. कुणी म्हणतात शुंभ-निशुंभ यांना मारणारी देवता दुर्गा होती, तर कुणी म्हणतात कालिका होती. असो. या प्रमाणे पार्वतीनं गोऱ्या रंगावर आपली मालकी शाबीत केली.

पुराणकथांतील देवतांबद्दल हजारो वर्षांपासून सगळ्यांनाच आकर्षण वाटत आलेलं आहे. अक्षयकथा या मालिकेत पुराणातील अशाच काही देवतांचा समावेश करण्यात आलेला आहे. या सर्वच कथा अतिशय रंजक आणि वैचित्र्यपूर्ण आहेत. या कथांमध्ये चित्रित केलेले स्त्री-मनाचे विविध अविष्कार आणि देव-देवतांचे गुंतागुंतीचे नातेसंबंध मानवी मनाशी जवळीक साधणारे आहेत.

या अक्षयकथा दुर्गा भागवतांनी अत्यंत रसाळ आणि सुबोध शैलीत सांगितलेल्या आहेत. त्यांची भाषाशैली ही सर्व वयाच्या, सर्व थरांतील वाचकांशी सुसंवाद साधणारी आहे.

या अक्षयकथांच्या अंतर्गत आम्ही प्रकाशित करीत असलेली पुस्तके खालीलप्रमाणे:

पार्वती आणि कालिका • सावित्री, सरस्वती, अदिती, लक्ष्मी • सीता आणि रेणुका • मोहिनी, कन्याकुमारी, सुभद्रा

ओरिएंट लाँगमन

मुखपृष्ठ : बद्रीनारायण
सजावट : वसंत प्रधान

Durga Bhagwat Parwati Aani Kalika (Marathi)
ISBN 0 86125 967 X

Rs.18.00